**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**<u>प्रश्नोत्तरांचा तास तहकूब करण्यासंबंधी नियम 289 अन्वये प्रस्तावाबाबत</u>**

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, महाराष्ट्राला अडचणीत टाकणारा निर्णय गुजरातचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी घेतला आहे.....

(अडथळा)

**सभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तरांचा तास तहकूब करण्यासंबंधी प्रस्ताव दिलेला आहे. त्या अनुषंगाने माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे...

(सत्ताधारी व विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, महाराष्ट्र होरपळत असतांना गुजरातचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राला संकटात टाकणारा निर्णय घेतला आहे. त्यावर चर्चा करण्याकरिता प्रश्नोत्तरांचा तास आपण तहकूब करावा अशी माझी आपणास विनंती आहे...

(अडथळा)

**सभापती** : माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड आपण कृपया खाली बसावे...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, गुजरातचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी महाराष्ट्राला अंधारात ढकलीत आहेत, महाराष्ट्राला विजेच्या संकटात टाकीत आहेत. त्यावर चर्चा करण्याकरिता प्रश्नोत्तरांचा तास तहकूब झाला पाहिजे.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड आपणास काय म्हणावयाचे आहे ते मला समजत नाही. आपण कृपया आपल्या जागेवर जाऊन बसावे...

(अडथळा)

श्री. विनोद तावडे : तुम्ही नाकर्ते आहात, तुम्ही कर्तव्यशून्य आहात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अडथळा)

**सभापती** : माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड आपणास काय म्हणावयाचे आहे ते मी ऐकून घेईन. कृपया आपण खाली बसावे... माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावासंबंधी आपले निवेदन करावे...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी माझे म्हणणे मांडतो. परंतु माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी प्रथम खाली बसावे...

**सभापती** : माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांना त्यांचे म्हणणे मांडण्यास जरुर परवानगी दिली जाईल. परंतु सभागृहाचे नियम माननीय सदस्यांना पाळावे लागतील. तेव्हा कृपया सदस्यांनी प्रथम खाली बसावे.

(अडथळा)

(विरोधी पक्षाकडील माननीय सदस्य घोषणा देतात.)

**सभापती** : माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड आपण खाली बसल्यानंतर मी आपणास आपले म्हणणे मांडण्यास अनुमती देईन.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृह चालविणे हे सत्ताधारी पक्षाचे काम आहे. सत्ताधारी पक्षाचे माननीय सदस्य सभागृहामध्ये गोंधळ घालीत आहेत तेव्हा त्यांना समज देण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

(अडथळा)

श्री. जितेद्र आव्हाड : सभापती महोदय, श्री.नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राला अंधारात टाकणारा निर्णय घेतला आहे...

(गोंधळ)

**सभापती** : आपण कृपया खाली बसावे. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तरांचा तास तहकूब करण्यासंबंधीचा प्रस्ताव दिला आहे. त्या अनुषंगाने माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला काय म्हणायचे आहे, ते सांगतो. सभागृहाचे कामकाज चालविण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे....(अडथळ)..

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, महाराष्ट्र अंधारात आहे....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.मधुकर सरपोतदार : महाराष्ट्र अंधारात आहे, हा शासनाचा नाकर्तेपणा आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : गुजरात सरकारने 15 कि.मी.ची पाईपलाईन अडवून ठेवलेली आहे. महाराष्ट्र त्यानी अंधारात ठेवलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांचे म्हणणे रेकॉर्डमधून काढून टाकण्यात येत आहे.

...(अडथळा)...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी कृपया खाली बसावे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अत्यंत गंभीर प्रश्न आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. त्याबाबत त्यांचे काय म्हणणे आहे, ते मी प्रथम ऐकून घेतो. सत्ताधारी पक्षाला प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याचा प्रस्ताव मांडता येत नाही. तरी सुध्दा अत्यंत महत्वाचा विषय मांडावयाचा असेल तर सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना मी नंतर बोलण्याची संधी देईन. सन्माननीय सदस्यांनी मोठ्याने ओरडून आपले म्हणणे माडण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या मनामध्ये काय आहे, हे मला समजणार नाही. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी त्यांच्या प्रस्तावाच्या संदर्भाने आपले म्हणणे मांडल्यानंतर आणि त्या प्रस्तावाच्या बाबतीत निर्णय झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना मी बोलण्यास परवानगी देईन. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, शिवसेना, भारतीय जनता पक्षातर्फे नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास रद्द करून दिनांक 7-4-2007 रोजी रामटेक लोकसभा निवडणुकीत काटोल येथे जी घटना घडली त्यावर चर्चा करावी, अशी विनंती केलेली आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू...

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये तीन ठिकाणी लोकसभेच्या निवडणुकीसाठीचे मतदान आज सुरू आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक 7 एप्रिल 2007 रोजी प्रचाराचा अंतिम दिवस होता. संध्याकाळी 5-30 वाजता प्रचार संपणार होता, त्यावेळेस गोंधळ घातला गेला. शिवसेनेचे काटोल येथील कार्यालय जयस्वाल इमारतीमध्ये आहे. त्या ठिकाणावरून कॉंग्रेसची निवडणूक प्रचार फेरी चाललेली होती. या प्रचार फेरीमध्ये महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री श्री.नारायण राणे हे होते तसेच कॉंग्रेसचे अन्य काही सदस्य होते. ते शिवसेनेच्या कार्यालयामध्ये घुसले आणि तेथील कार्यकर्त्यांच्या छातीवर रिव्हॉल्व्हर रोखून आपल्या कार्यकर्त्यांना सांगितले की, "त्यांना मारा आणि हुसकावून लावा",अशाप्रकारचे उद्‌गार महसूल मंत्र्यांनी काढले आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना दमबाजी केली. त्याचा परिणाम म्हणून त्या परिसरामध्ये दहशत निर्माण झाली. निवडणुकीमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण करून विरोधी बाजूच्या कार्यकर्त्यांमध्ये त्यांनी दहशत निर्माण केली. मंत्र्यांनी अशाप्रकारे धमकी दिल्यानंतर त्या ठिकाणी जनतेमध्ये वेगळे वातावरण निर्माण झाले आणि त्याचा परिणाम म्हणून कार्यकर्त्यांना मारझोड करण्यात आली. जखमी झालेल्या शिवसेना कार्यकर्त्यांना हॉस्पिटलमध्ये नेत असतांना, त्यांच्या खिशामधून पाकिटे काढून घेतली गेली. या प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला आहे. त्यामध्ये 395, 324, 307 अशी नॉन बेलेबल कलमे लावलेली आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

त्या लोकांच्या विरोधात पोलिसांनी एफ.आय.आर. दाखल केलेला आहे. त्या ठिकाणचे पोलीस अधीक्षक श्री. यादव हे त्या प्रसंगी उपस्थित होते. त्यांनी खूप मेहनतीने आणि समजूतदारपणा दाखवून पुढचा वाईट प्रसंग टाळला. नाही तर त्या ठिकाणी निराळे चित्र दिसले असते. त्या ठिकाणाहून दोन चार मुडदे उचलून घेऊन जावे लागले असते. महाराष्ट्रामध्ये कायदा व सुव्यवस्थेची होळी झालेली आहे. शिमगा नुकताच पार पडलेला आहे. माझ्याकडे संपूर्ण आकडेवारी आहे. ती आकडेवारी मी चर्चेच्या वेळी देणार आहे. महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था नावाची परिस्थिती राहिलेली नाही. या पार्श्वभूमीवर या महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री ज्यांना आपण सगळे वसूल मंत्री म्हणतो ते वसुली करण्यासाठी त्या ठिकाणी गेले. ते हातात रिव्हॉल्वर घेऊन दहशत निर्माण करीत असतील तर त्याचा निषेध व्हावा या दृष्टीकोनातून आम्ही हा प्रस्ताव दिलेला आहे. हा विषय अत्यंत गंभीर आहे आणि त्याची ताबडतोब दखल घेण्याची आवश्यकता आहे आणि त्यावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे तसेच त्याबाबत शासनातर्फे कारवाई करुन महाराष्ट्राच्या महसूल मंत्र्यांचा राजीनामा घेण्याची आवश्यकता आहे. या उद्देशाने आम्ही हा प्रस्ताव मांडलेला आहे. आपण आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थिगित करुन या विषयावर चर्चा घेऊन याचा अंतिम निकाल द्यावा या उद्देशाने हा प्रस्ताव आपल्यासमोर मांडलेला आहे. आपल्या माहितीसाठी एफ.आय.आर. आणि तेथील वस्तुस्थितीची माहिती आपल्यासमोर मांडलेली आहे. ज्यावेळी या प्रस्तावावर चर्चा सुरु होईल त्यावेळी यासंदर्भात विस्तृत बाजू मांडली जाईल. प्रश्नोत्तराचा तास अतिशय महत्वाचा आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे प्रश्न या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये असतात. प्रश्नोत्तराचा तास रद्द करण्याची परिस्थिती यावी अशी आमची कोणाचीही मानसिकता नसते परंतु या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या महाराष्ट्राचे जबाबदार महसूल मंत्री ज्यावेळी अत्यंत बेजबाबदार कृत्य करण्यास उभे राहतात, हातात शस्त्र घेऊन एखाद्या कार्यालयात घुसतात त्यावेळी महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था संपली असा त्याचा अर्थ होतो. इतका हा प्रकार गंभीर आहे. म्हणून आजचा प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या विषयावर चर्चा व्हावी असा आम्ही नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्याचा स्वीकार करुन त्यावरील चर्चा सुरु करावी अशी मी या निमित्ताने आपल्याला नम्र विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये आज तीन ठिकाणी पोट निवडणुका होत आहेत. त्या निमित्ताने 7 तारखेला या निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस होता. 7 तारखेला सर्वदूर निवडणूक प्रचाराच्या अंतिम प्रचार फेऱ्या सर्व मतदारसंघांमध्ये निघत होत्या. अशा परिस्थितीमध्ये रामटेक लोकसभा मतदारसंघामध्ये काटोल शहरामध्ये एक शेवटची प्रचारयात्रा काढण्यात आली. सदरहू प्रचारयात्रा शिवसेनेच्या कार्यालयासमोरुन जात असताना काँग्रेसच्या समर्थकांनी त्या ठिकाणी नारेबाजी केली. त्यांनी चिथावणीखोर नारे लावले. दु:ख याचे आहे की, त्या प्रचार यात्रेमध्ये राज्याचे महसूल मंत्री तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा आणि त्या मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेद्वार श्री. सुबोध मोहिते या तीनही जबाबदार व्यक्ती हजर असताना अशा प्रकारे नारेबाजी करुन नंतर त्या कार्यालयावर हल्ला करुन कार्यालयाची मोडतोड करण्यात आली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पायदळी तुडवला गेला. अशी गंभीर स्वरुपाची परिस्थिती त्या ठिकाणी निर्माण झाली. त्या ठिकाणी रिव्हॉल्वर काढले गेले, शस्त्र काढले गेले. अनेक कार्यकर्त्यांना मारहाण झाली. लोकशाहीमध्ये निवडणुका शांततेत पार पडल्या पाहिजेत, नि:पक्षपातीपणे, चांगल्या वातावरणात पार पडल्या पाहिजेत, पारदर्शकपणे पार पडल्या पाहिजे असे असताना त्या ठिकाणी दशहतीचे वातावरण निर्माण करुन, या राज्याचे जबाबदार मंत्री, सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्राच्या प्रदेशाध्यक्षा हजर असताना ज्या पध्दतीचे वर्तन त्या ठिकाणी करतात ते लोकशाहीला काळिमा फासणारे आहे. त्या ठिकाणी गंभीर स्वरुपाचा गुन्हा घडलेला असताना आज त्या ठिकाणी मतदान सुरु आहे. हा विषय गंभीर आणि महत्वाचा आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्या प्रस्तावावर चर्चा घ्यावी. एखाद्या दिवशी प्रश्नोत्तराचा तास झाला नाही तरी चालेल परंतु भविष्यामध्ये या राज्यात ज्या ज्या निवडणुका होतील त्या त्या निवडणुका अशा प्रकारे झाल्या तर मतदारांमध्ये प्रचंड दहशत निर्माण होणार आहे. म्हणून या प्रस्तावावर या ठिकाणी चर्चा झाली पाहिजे. लोकशाही वाचवण्याच्या दृष्टीने या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे. सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला सारुन आपण या चर्चेला परवानगी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काटोलमध्ये कायदा व सुव्यवस्था कोलमडलेली आहे. मी मागे म्हणालो होतो की, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो. मालवण झाले, खेड झाले, श्रीवर्धन झाले. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी अशा प्रकारचे अनुचित प्रकार होत आहेत. या राज्याचे माननीय मंत्री, त्यांना माननीय म्हणावे की म्हणू नये असा प्रश्न निर्माण झालेला आहे. कारण मंत्री सरळ रस्त्यावर उतरतात, प्रत्येक ठिकाणी गुंडगिरी करतात आणि अशा प्रत्येक वेळेला सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित होतो, या प्रकाराकडे सरकारतर्फे कानाडोळा केला जातो. काटोलमध्ये भीषण परिस्थिती निर्माण झालेली आहे. पुढे गेलेली मिरवणूक पुन्हा फिरवून आणली. स्वत: महसूल मंत्री तेथे उभे राहून स्वत: असे उच्चारतात की, खेचा त्याला, ठेचा त्याला. त्या ठिकाणी 8-10 जणांनी त्यांच्याकडील रिव्हाल्व्हर काढून त्यातील चक्रे फिरवून दाखविली. त्यांच्याकडे रिव्हाल्व्हरचे परवाने आहेत काय ? ही रिव्हाल्व्हर्स् मिरवणुकीच्या वेळी दाखविण्याकरिता आहेत काय ? सभापती महोदय, अत्यंत भयावह आणि भीषण अशी परिस्थिती त्या ठिकाणी निर्माण झालेली आहे. म्हणून या घटनेसंबंधीची चर्चा या सभागृहामध्ये तातडीने होणे आवश्यक आहे. या घटनेची नोंद राज्य सरकारने घेतलेली आहे हे राज्यातील जनतेला समजणे आवश्यक आहे. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची दादागिरी आणि गुंडगिरी होणार असेल तर त्यासंदर्भात शासनाने कोणती भूमिका घेतलेली आहे, हे या सदनाला समजले पाहिजे. सभापती महोदय, सदर घटनेमध्ये पोलीस बघ्याची भूमिका घेऊन बाजूला उभे राहातात, आम्हाला ते दाद देत नाहीत, उलट आमच्यावरच गुन्हे दाखल करतात. हे पोलीस कुणासाठी नियुक्त झालेले आहेत ? सभापती महोदय, अत्यंत भयावह आणि भीषण अशी परिस्थिती काटोल आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये निर्माण झालेली आहे. प्रत्येक निवडणुकीमध्ये गुंडगिरी होत असेल तर त्याबाबतीत राज्य शासनाची भूमिका काय आहे, हे समजणे आवश्यक आहे. या राज्याचे एक मंत्री गुंडगिरी करीत असतील तर त्यांना रोखले पाहिजे, त्यांना जाब विचारला पाहिजे. म्हणून आजचा प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर चर्चा घडवून आणावी अशी माझी आपणास विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, ज्याचे विरोधी मत आहे त्यालाही जगण्याचा अधिकार आहे असे आपण लोकशाहीमध्ये गृहीत धरीत असतो. रिव्हाल्व्हर दाखविणे, धमक्या देणे याचे निवडणुकीवर काय परिणाम होऊ शकतात याची आपणाला कल्पना आहे. काटोल मध्ये घडलेल्या प्रकाराबाबतचा एफआयआर पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेला आहे. त्याची प्रत मिळालेली आहे. महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांच्यावर फार गंभीर स्वरुपाची कलमे दाखल झालेली आहेत. त्या ठिकाणी आज मतदान होत असून 11 तारखेला निकाल लागणार आहे. विदर्भातील निवडणुका ह्या शांततेने पार पाडल्या जातात अशी विदर्भाची ख्याती आहे. परंतु काटोलमध्ये घडलेल्या प्रकारामुळे काटोल आणि संपूर्ण नागपूर परिसिरामध्ये अशांतता निर्माण झालेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा मलिन झाल्यामुळे कार्यकर्त्यांच्या भावना प्रक्षुब्ध झालेल्या आहेत. तेथील नागरिकांना कशा प्रकारे संरक्षण दिले जाणार आहे हे पाहाण्यासाठी संपूर्ण जनतेचे लक्ष विधिमंडळाकडे लागलेले आहे. विधिमंडाळाची दोन्ही सभागृहे ही कोणाच्याही दबावाला बळी पडत नाहीत अशी या सदनांची परंपरा आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या गंभीर अशा विषयावर चर्चा करावी असे आवाहन केले आहे. त्या ठिकाणीची वस्तुस्थिती सदनासमोर यावी यासाठी या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी मी आपणास विनंती करते.

श्री. संजय दत्त : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, सन्माननीय विराधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा प्रस्ताव विरोधी पक्षातर्फे देण्यात आलेला आहे. या प्रस्तावावर अजून चर्चा सुरु झालेली नाही. त्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना यावर बोलता येणार नाही.

**सभापती** : नियम 289 अन्वये प्रस्ताव स्वीकारण्यासंबंधी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी ज्याप्रमाणे आपली मते मांडली त्याप्रमाणे अन्य कोणत्याही सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपले मत मांडावयाचे असेल तर ते मांडण्याची त्यांना परवानगी दिली जाते.

...3..



(सभापती....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यापूर्वी सुध्दा या सदनामध्ये ज्या ज्या वेळी अशा प्रकारचे प्रस्ताव आले होते त्या त्या वेळी प्रस्ताव देणा-या सन्माननीय सदस्यांप्रमाणेच अन्य सन्माननीय सदस्यांनाही त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिलेली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझी आपणास नम्र विनंती आहे की, नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे तो आपण स्वीकारु नये. तसेच सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे साहेब यांच्या विषयी तसेच काँग्रेस पक्षाविषयी दिलेली माहिती ही वस्तुस्थितीला धरुन नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : यांचा काय संबंध? हे तिथे होते का?

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आम्हाला म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. आपण आमचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि नंतर योग्य तो निर्णय द्यावा.

श्री.दिवाकर रावते : हे तिथे होते काय? आम्ही तिथे होतो.

श्री.संजय दत्त : आमचा अधिकार कोणी हिरावून घेऊ शकत नाही. मालवणच्या पोटनिवडणुकीत तेथील जनतेने निकाल दिला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी कृपया खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रत्येक वेळेला यांच्या दादागिरीला आम्ही सामोरे जायचे काय?

**सभापती** : या सदनामध्ये अनेकवेळेला नियम 289 अन्वये प्रस्ताव दाखल होतात आणि याठिकाणी मागणीही केली जाते की, आजचा प्रश्नोत्तराचा तास किंवा अन्य महत्वाचे कामकाज तहकूब करुन जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावर चर्चा व्हावी. यापूर्वी सुध्दा मी अनेकदा हे पाहिले आहे. ज्याप्रमाणे नियम 289 अन्वये दिलेला प्रस्ताव कसा महत्वाचा आहे हे प्रस्तावकर्त्यांकडून सांगितले जाते तसे अन्य एखादे मत असेल तर ते सुध्दा सभापतींनी ऐकून घेण्यामध्ये काही गैर आहे असे मला वाटत नाही.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, नियम 47 अन्वये मी वैयक्तिक स्पष्टीकरण करु इच्छितो.

श्री.मधुकर सरपोतदार : जोपर्यंत या प्रस्तावावर चर्चा होत नाही तोपर्यंत स्पष्टीकरण देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माझ्या नावाचा उल्लेख झालेला आहे.

**सभापती** : ज्यावेळी नियम 289 चा प्रस्ताव दिला, त्यामध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष एखाद्या सन्माननीय सदस्यांचा किंवा माननीय महसूलमंत्र्यांच्या नावाचा उल्लेख होतो........

श्री.मधुकर सरपोतदार : चर्चेनंतर सन्माननीय महसूल मंत्री स्पष्टीकरण देऊ शकतील. प्रथम आपण प्रस्तावासंबंधी निर्णय द्यावा, त्यानंतर महसूलमंत्र्यांनी खुलासा करावा.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : ज्यावेळी माननीय महसूलमंत्र्यांचे नाव घेतले जाते त्या अनुषंगाने त्यांना बोलण्यासाठी प्रतिबंध करणे बरोबर नाही. मी नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी परवानगी दिली तर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होईल. मी परवानगी दिली नाही तर ही चर्चा याठिकाणी थांबेल. म्हणून माननीय महसूलमंत्र्यांनी याठिकाणी दोन मिनिटात काय असेल ते स्पष्टीकरण जरुर करावे.

--------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGB/ MHM/ SBT/ MHM/ SBT/ 13:20

**पृ.शी./मु.शी.** : रामटेक लोकसभा पोटनिवडणुकीच्या प्रचार फेरीमध्ये झालेल्या प्रकारासंबंधी श्री.नारायण राणे, महसूलमंत्री यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण.

श्री.नारायण राणे (महसूलमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील वैयक्तिक स्पष्टीकरण देत आहे.

माननीय सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर तसेच अन्य सन्माननीय सदस्यांनी जो नियम 289 चा प्रस्ताव मांडला, त्या प्रस्तावासंबंधी मला काही बोलायचे नव्हते. तो प्रस्ताव जेव्हा चर्चेला येईल तेव्हा सरकारचा जो संबंध असेल त्याप्रमाणे खुलासा करण्यात येईल. या प्रस्तावावर बोलत असताना सन्माननीय सदस्यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला होता. जेव्हा एखाद्या सदस्याचे नाव घेतले जाते तेव्हा त्या सदस्याला माननीय सभापतींनी परवानगी दिल्यास वैयक्तिक स्पष्टीकरण करण्याचा अधिकार आहे. त्या अधिकारानुसार मी बोलण्यासाठी उभा आहे.

माननीय सभापती महोदय, याठिकाणी ज्या सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली, ती सगळीच मी ऐकलेली नाहीत. परंतु शेवटचे काही विचार मी ऐकले. रामटेक लोकसभा मतदारसंघात आज 9 एप्रिल, 2007 रोजी मतदान होत आहे. 7 एप्रिल, 2007 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत प्रचाराची मुदत होती. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआय पक्षातर्फे त्या दिवशी दुपारी 1.00 वाजता काटोल येथे रोड शो सुरु असताना शिवसेना कार्यालयाच्या समोर जेव्हा रोड शो आला त्यावेळेला शिवसेना कार्यालयातून 150 ते 200 जणांनी रोड शोमध्ये सहभागी झ ालेल्या स्त्री-पुरुषांवर ज्याप्रकारे हातात असलेल्या वस्तू, दगडांचा वर्षाव केला, अश्लिल चाळे केले.......(अडथळा).........जसे खोटे बोला, पण रेटून बोला असे काम यांच्याकडून केले जाते. त्यामुळेच या महाराष्ट्राला आणि सभागृहाला हे कळले पाहिजे. छत्रपती शिवरायांच्या नावाचा, तसबिरीचा सुध्दा अवमान करायचा. महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने धंदा करुन पोट भरण्याचे काम काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व आरपीआय या पक्षाने केलेले नाही. ज्यांच्या नावाने पोट भरण्याचे काम करता, त्यांच्याच बाबतीत अपवित्र कृत्य करायचे..........

(नंतर श्री.जुन्नरे.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ...

आणि त्या ठिकाणी राणे उपस्थित होते असे सांगतात परंतु त्या ठिकाणी तुम्हीच उपस्थित होता. आपण त्या ठिकाणी पहिला अटॅक केलेला आहे. त्या ठिकाणी शिवसेनेच्याच कार्यकर्त्यांनी भडकवण्याचे काम केलेले आहे, अश्लील चाळे केलेले आहेत, घृणास्पद चाळे केलेले आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या प्रस्तावावर चर्चा होईल किंवा नाही यासंदर्भात आपण निर्णय दिलेला नाही. त्यामुळे या प्रस्तावावर चर्चा झ ाल्यानंतर सन्माननीय मंत्री महोदयांना वैयक्तिक स्पष्टीकरणास परवानगी द्यावी.......

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, माझ्याकडे एफआयआरची प्रत आहे. एफआयआर आणि तक्रार यामध्ये फरक आहे. एफआयआर आणि तक्रार यामध्ये काय फरक आहे तो आपण प्रथम जाणून घ्यावा. या प्रकरणाच्या संदर्भात तक्रार कोणी केली? तक्रार करण्यामध्येच त्यांच्याकडून चूक झालेली आहे. कलम 307 आणि कलम 395 ही कलमे कशाच्या संदर्भात लावली जातात ? तक्रार करण्यामध्येच त्यांच्याकडून चूक झालेली आहे. तक्रार करतांना त्यांनी सल्ला घ्यावयास पाहिजे होता. त्या लोकांनी स्वत:च हे कृत्य केलेले आहे. शिवसेनेचा इतिहास कसा आहे याची मला चांगली माहिती आहे. इतके दिवस मी शिवसेनेत होतो. शिवसेना सोडून मला फक्त पावणेदोन वर्षे झालेली आहेत. शिवसेनेमध्ये कशा प्रकारचे काम चालते याची मला चांगली कल्पना आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांना हरकतीचा मुद्दा मांडण्यास मी परवानगी देत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हरकतीच्या मुद्यासंदर्भात मला या ठिकाणी विचार मांडावयाचे आहेत. या सर्व प्रकरणावर चर्चा होत नाही तोपर्यंत सन्माननीय मंत्र्यांना वैयक्तिक खुलासा करता येणार नाही. माननीय मंत्री महोदयांचे नाव वारंवार चर्चेमध्ये आले तर सन्माननीय मंत्रीमहोदयांना वैयक्तिक स्पष्टीकरण करता येते अशी नियमात तरतूद आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांना बोलू देण्यास आमचा विरोध नाही. या ठिकाणी आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे त्याला फार महत्व आहे. सन्माननीय मंत्री महोदयांकडून आम्हाला कायदा शिकण्याची आवश्यकता नाही. आता ते मंत्री झालेले असल्यामुळे त्यांनी आम्हाला कायदा

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.......

शिकवण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्यांच्याकडून कायद्याचे ज्ञान शिकण्यास तयार आहोत. ज्यावेळेस या प्रस्तावावर चर्चा होईल त्यावेळेस माननीय मंत्रीमहोदयांनी त्यांना पाहिजे तसे उत्तर द्यावे. सन्माननीय मंत्री महोदयांनी चर्चा झाल्यानंतर वैयक्तिक स्पष्टीकरण केले तर आमचा त्याला विरोध असणार नाही. परंतु या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदयांनी "छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन पोट भरतात" अशा प्रकारचा आरोप केलेला आहे. या चर्चेला उत्तर देतांना आपण काही मुद्दे मांडले असते, वैयक्तिक खुलासा केला असता तर ते चालले असते.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, डॉ. नीलम गो-हे यांनी या ठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. हा प्रस्ताव स्वीकारणे कसे योग्य आहे यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी विचार मांडलेले आहेत. तसेच हा प्रस्ताव स्वीकारणे कसे योग्य राहील यासंदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, डॉ. नीलम गो-हे यांनी देखील आपले विचार व्यक्त केलेले आहेत. हा प्रस्ताव स्वीकारावा किंवा न स्वीकारावा याबाबत मी अजून निर्णय दिलेला नाही. सन्माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे सभागृहात उपस्थित असून मी त्यांना नियम 47 खाली वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यास परवानगी दिली आहे. मी या प्रस्तावाला परवानगी दिल्यानंतरच त्यावर चर्चा होऊ शकेल. प्रस्तावाला परवानगी दिली नाही तर या ठिकाणी चर्चा होण्याचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे मी माननीय महसूल मंत्र्यांना वैयक्ति स्पष्टीकरण करण्याची संधी दिली त्यामध्ये काही गैर आहे असे मला वाटत नाही. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना प्रश्नोत्तराच्या तासाचे महत्व किती आहे हे माहीत आहे. प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा आहे असे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सुध्दा म्हटलेले आहे. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी एका अत्यंत महत्वाच्या बाबीच्या संदर्भात नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. दिवसाच्या कामकाज पत्रिकेत समाविष्ट असलेल्या कामकाजाच्या अनुषंगाने जर नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला असेल तरच आपण प्रस्ताव स्वीकारण्याच्या बाबतीत निर्णय घेत असतो.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती**.............

परंतु आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर अशा पध्दतीचे कोणतेही कामकाज नसल्यामुळे नियम 289 अन्वये दिलेला प्रस्ताव मी येथेच नाकारीत आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय ............

**सभापती** : सनमाननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना मी सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर प्रथम तुम्हास संधी देण्यात येईल. मी याठिकाणी निर्णय दिलेला आहे. मी आता प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करतो.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना पुन: सांगतो की,मी याबाबत निर्णय दिलेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**परप्रांतिय डॉक्टर्सना महाराष्ट्रात प्रॅक्टीस करण्यास बंदी घालण्याबाबत**

**(१) * २४५०६ डॉ. दिपक सावंत , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोर्‍हे , श्री. दिवाकर रावते , श्री. धनाजी साठे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशनर ॲक्ट व दिल्लीतील इंडियन मेडिकल कॉन्सिल या दोन संस्थांची मान्यता असल्याशिवाय अन्य राज्यांतील आयुर्वेदिक डॉक्टरांना महाराष्ट्रात मेडिकल प्रॅक्टीस करण्यास बंदी आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशी कायदेशीर बंदी असूनही या राज्यात उत्तरप्रदेश बिहार या राज्यातील शेकडो आयुर्वेद डॉक्टर आपला वैद्यकिय व्यवसाय राजरोसपणे करीत आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, परप्रांतिय आयुर्वेदिक डॉक्टरांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

**दिलीप वळसे-पाटील** : (१) होय. तथापि, दिल्लीतील आयुर्वेदशी संबंधित संस्था ही सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडीसीन आहे.
(२), (३), (४) परराज्यातील नोंदणी केलेल्या आयुर्वेद व्यवसायिकांच्या यादीतील एकूण ११८७ वैद्यकीय व्यावसायिकांची नोंदणी पोलिसांच्या गुन्हा अन्वेषण विभागाकडून तपासणी केल्यानंतर महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन ने रद्द केली असून त्यांच्याविरुध्द पोलिसांकडूनही कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन यांचेकडून आयुर्वेदिक डॉक्टरांची नोंदणी केली जाते. बिहार व उत्तरप्रदेश व इतर राज्यांमधील ज्या डॉक्टरांनी त्या त्या राज्यातील अधिकृत विद्यापीठांची पदवी घेतलेली आहे असे वैद्यकीय व्यावसायिकांना नोंदणी देण्यापूर्वी त्यांचे पडताळणी संबंधित विद्यापीठांकडून संबंधित राज्यपरिषदेकडून, त्याचप्रमाणे स्थानिक पोलिसांकडून केली जाते. या सर्व प्राधिकारांनी पडताळणी केल्यानंतर संबंधित व्यावसायिकांस महाराष्ट्रात सध्या नोंदणी दिली जाते.

याशिवाय बोगस डॉक्टरांविरुध्द परिणामकारक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने शासनाने जिल्हानिहाय, तालुकानिहाय समित्या स्थापन केल्या आहेत. या समित्यांकडून बोगस डॉक्टरांवर पोलिसांमार्फत कार्यवाही केली जात असते.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, उत्तरामध्ये नमूद केले आहे की, बोगस डॉक्टरांविरुध्द परिणामकारक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने शासनाने जिल्हानिहाय, तालुकानिहाय समित्या स्थापन केल्या आहेत. या समित्या कोणाच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या आहेत ? या समित्यांचे कामकाज सुरु आहे का ?

( उत्तर आले नाही. )

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

-----------

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्राला विद्यापीठाचा दर्जा देणेबाबत**

**(२) * २६४१३ श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्राला विद्यापीठाचा दर्जा द्यावा या मागणीसाठी विद्यार्थी संघटनांनी दिनांक १० ऑगस्ट, २००६ रोजी उपकेंद्रावर धडक मोर्चा काढलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच रत्नागिरी उपकेंद्राला विद्यापीठाचा दर्जा मिळावा यासंदर्भात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) नाही,

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी येथील उपकेंद्राला विद्यापीठाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही, तथापि रत्नागिरी उपकेंद्रामध्ये शैक्षणिक व प्रशासकीय सुविधांमध्ये वाढ करण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून सुरु आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, उत्तराने माझे समाधान झालेले आहे.

-----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र कल्याण येथे करण्याबाबत**

**(३) * २४५१० श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठ उपकेंद्रासाठी कल्याण हीच सर्वोत्तम जागा असून, सुमारे दीड लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणाऱ्या मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र कल्याण मध्येच होण्याची मागणी सर्व लोकप्रतिनिधी व नेत्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१), (२) व (३) मुंबई विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाचे सदस्य आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी मुंबई विद्यापिठाचे उपकेंद्र कल्याण-डोंबिवली येथे स्थापन करावे अशी मागणी केली आहे. तसेच काही सदस्य व ठाणे महानगरपालिका यांनी विद्यापीठाचे उपकेंद्र ठाणे येथे स्थापन करावे अशी मागणी केली आहे. याप्रकरणी अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने सात सदस्यीय समिती गठीत केली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप विद्यापीठाकडे प्राप्त झालेला नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र ठाणे जिल्ह्यात व्हावे अशी तेथील विद्यार्थ्यांची भावना आहे.........

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**सभापती** : अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.32 वाजता 15 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती श्री.भास्कर जाधव )**

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : अशा परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज पुढे चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 01.47 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

(माननीय उपसभापती आसनस्थ होताच दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देण्यास सुरुवात करतात.)

**<u>सभागृहाच्या कामकाजाबाबत</u>**

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेली बाब क्रमांक 2 कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे,नियम 93 अन्वयेच्या सूचना, लक्षवेधीच्या सूचना, सन 2005 चे वि.स.वि. क्र 73 तसेच बाब क्र. 7 नुसार दर्शविण्यात आलेला सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, सय्यद पाशा पटेल, अरविंद सावंत, श्रीकांत जोशी, सुरेश जेथलिया, केशवराव मानकर,वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव तसेच बाब क्रमांक 8 वर दर्शविण्यात आलेला सर्वश्री. मुझफफर हुसेन, सुधीर सावंत , भास्कर जाधव, राजन तेली, श्रीमती सुधा जोशी, श्रीमती मंदा म्हात्रे, संजय दत्त,वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव, बाब क्रमांक 9 वर दर्शविण्यात आलेल्या सर्व अर्धातास चर्चा पुढे ढकलण्यात येत आहे.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

..........................

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO. I OF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAYPRIMARY EDUCATION ACT, 1947 AND THEMAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OSERVICE) REGULATION ACT, 1977.)**

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 1 - मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1947 आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियमन,1977 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 12 ( दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.प. वि. क्रमांक 1 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2007 चे वि.प.वि. क्रमांक 1 संमत झाले आहे.

..................

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

यानंतर श्री. रोझेकर ...

**पृ.शी.**: महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. VIII OF 2007.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.)

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्र.8-मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्र.8-मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 13 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्र.8 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन 2007 चे वि.स.वि.क्र.8 संमत झाले आहे.

-----------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (तात्पुरती सुधारणा) विधेयक

L. A. NO. XIV OF 2007.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949.)

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्र.14-मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्र.14--मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्र.14 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

..4..........



(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन 2007 चे वि.स.वि.क्र.14 संमत झाले आहे.

-----------------

यानंतर कुमारी धनश्री.........

अस्थारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देत असतात.)

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभागृहात गोंधळ सुरु असतांना सन 2007 चे वि.प.वि.क्र. 1 - मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी ( सेवेच्या शर्ती ) विनियमन विधेयक मंजूर झाले आहे. या विधेयकाला आमचा विरोध आहे. आम्हाला या विधेयकावर आमचे विचार मांडावयाचे होते, म्हणून अशी विनंती आहे की, सदर विधेयक मंगळवार,दिनांक 10 एप्रिल,2007 रोजी चर्चेला घेण्यात यावे.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, कृपया मी काय बोलतो हे ऐकून घ्यावे. मी सन 2007 चे वि.प.वि.क्र.1 सभागृहात पुकारले त्यावर आपल्याला बोलण्याची संधीही दिली होती, परंतु त्यावेळी दोन्ही बाजूचे सदस्य घोषणा देत होते.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

**उपसभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक आता स्थगित करतो.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार,दिनांक 10 एप्रिल, 2007 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 12 मिनिटांनी, मंगळवार,दिनांक 10 एप्रिल,2007 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही